दि. १५/०२/२०२१

-: प्रेसनोट :-

यातील फिर्यादी यांचे दुकानाच्या साईन बोर्ड संदर्भात बृहन्मुंबई महानगर पालिका येथे कारवाई न करण्याकरीता यातील आलोसे यांनी फिर्यादीकडे रु.२,२५,०००/- रक्कमेची लाचेची मागणी करुन, तडजोडीअंती रु.६०,०००/-लाचेची रक्कम स्विकारली म्हणुन गुन्हा नोद.

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग | मुंबई विभाग |
| गुन्हा नोंद क्रमांक | ०६/२०२१ |
| कलम | ७, १२ भ्र.प्र. अधिनियम १९८८ |
| आरोपीताचे नाव व कार्यालय | १) श्री.नितीन गणपत पाटणकर, वय ४९, पद - निरीक्षक, अनुज्ञापन विभाग म.न.पा., पी/नॉर्थ वार्ड, मालाड (पश्चिम), मुंबई<br>२) श्री.हरिश्चंद्र नानाभाऊ घेगडमल, वय ५३ वर्षे, पद-निरीक्षक, अनुज्ञापन विभाग, म.न.पा., पी/नॉर्थ वार्ड, मालाड (पश्चिम), मुंबई<br>३) श्री.सुदेश कलथ्थूर पॉल,वय ४१ वर्षे -खाजगी इसम |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रु.२,२५,०००/- |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रु. ६०,०००/- |
| थोडक्यात माहिती | फिर्यादी हे चारकोप परिसरात रहात असुन, त्याच्या दुकानाच्या साईन बोर्ड संदर्भात कारवाई न करण्याकरीता आलोसे क्र. १ व २ यांनी फिर्यादीकडे रु.२,२५,०००/- रक्कमेची लाचेची मागणी केली.<br>सदरची रक्कम फिर्यादीस लोकसेवक यांना दयावयाची नसल्याने फिर्यादीने दिनांक ११/०२/२०२१ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी मुंबई येथे प्रत्यक्ष येवून, लेखी तक्रार दिली.<br>फिर्यादी यांच्या तक्रारीवरुन दिनांक ११/०२/२०२१ रोजी पडताळणी केली असता, आलोसे क्र. १ व २ यांनी फिर्यादी यांच्या दुकानाच्या साईन बोर्ड संदर्भात कारवाई न करण्यासाठी तडजोडीअंती रू. ६०,०००/- रक्कमेची लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. त्यावरुन आज दि.१५/०२/२०२१ रोजी सापळा कारवाई दरम्यान आलोसे क्र. १ व २ यांनी रु.६०,०००/- लाचेची रक्कम मागणी करून आलोसे क्र १ याने आरोपी क्र ३ या खाजगी इसमाकडे लाचेची रक्कम देण्यासाठी सांगितलेवरून आरोपी क्र ३ यांनी लाचेची रक्कम स्विकारली असता दोन लोकसेवक व एक खाजगी इसम यांस रंगेहात पकडण्यात आले आहे. |

( आबासाहेब पाटील )
सहायक पोलीस आयुक्त,(प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग मुंबई

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबधीत काही माहिती असल्यास अगर लाच मागणा-या लोकसेवकाबददल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क- लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग ९१, सरपोचखानवाला रोड, वरळी, मुंबई ३०

संकेतस्थळ-acbmaharastra.gov.in

ईमेल- १)acbwebmail@mahapolice.gov.in

२)addlcpacbmumbai@mahapolice.gov.in.

ऑनलाईन तक्रार अर्ज-www.acbmaharastra.net.टोलफ्रि. क्र. १०६४